विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांच्या वेतनाबाबत....

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण आणि सेवायोजन विभाग
शासन परिपत्रक क्रमांक- एनजीसी-१७९६/८१५८/(४१२६)/विशि- ४
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई -४०० ०३२
दिनांक - ११ एप्रिल १९९७.

वाचा- १. शासन निर्णय, शिक्षण व सेवायोजन विभाग क्र. एनजीसी.
१२७७/१२२१६६/३२(सेल) दिनांक २१ सप्टेंबर १९७७.

शासन परिपत्रक - शासन निर्णय, शिक्षण व सेवायोजन विभाग क्रमांक- एनजीसी १२७७/१२२१६६/३२( सेल ) दिनांक २१ सप्टेंबर १९७७ अन्वये विद्यापीठाशी संलग्नित असणा-या अशासकीय अनुदानित कला, विज्ञान, वाणिज्य, शिक्षणशास्त्र व विधी इ. मधील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांना त्यांचे वेतन व भत्ते यांचे वाटप पूर्ण वेळेवर करण्याच्या दृष्टीने योजना कार्यान्वित करण्यात आली आहे.

२. विद्यापीठ अनुदान आयोगाने शासनाच्या असे निदर्शनास आणून दिले आहे. की, विनाअनुदानित महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांच्या विविध प्रश्नांबाबत आणि अशा महाविद्यालयांच्या व्यवस्थापकांकडून होणा-या गैर-व्यवहाराबाबत शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांच्या नियुक्त्या करतांना व विद्यार्थ्यांना प्रवेश देतांना अशा महाविद्यालयातून बे-कायदा अनुचित प्रकार वारंवार घडतात. शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांना वेतन अदा करतांना अशा संस्थांमधून पूर्ण वेतनावर सही घेऊन त्यांना कमी वेतन अदा केले जाते. अशा स्वरूपाच्या तक्रारींकडे आयोगाने राज्य शासनाचे लक्ष वेधले आहे.

३. वरील सर्व बाबी लक्षात घेता या विभागाच्या नियंत्रणाखाली असणा-या सर्व अशासकीय अनुदानित व विनाअनुदानित महाविद्यालयाच्या व्यवस्थापनांच्या निदर्शनास ही बाब आणून देण्यात येत आहे की, महाविद्यालयातून होणा-या अशा गैरप्रकाराचा परिणाम, शिक्षणाचा दर्जा खालावणे यात होतो. म्हणून सर्व संस्था चालकांना असे सूचित करण्यात येते की, अशा प्रकारचे गैरव्यवहार कर्मचा-यांची नियुक्ती करतांना व विद्यार्थ्यांना प्रवेश देतांना घडणार नाही याची दक्षता घ्यावी.

४. शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांचे वेतन नियमित व पूर्ण स्वरूपात व्हावे म्हणून सर्व अनुदानित व विनाअनुदानित , संलग्नित महाविद्यालयांनी खालील प्रकारच्या कार्यपध्दतीचा अवलंब करावा असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

SM
20/6/97

149 - 20/6/97

१. शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांच्या वेतनाकरीता महाविद्यालयाने बँकेत स्वतंत्र खाती उघडलेली असतात. सदर खात्यात जमा होणा-या रकमेमधुन मान्य शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांना वेतन अदा करणे अपेक्षित आहे. परंतु बहुसंख्य महाविद्यालये वेतन खात्यातून अमान्य बाबींवर खर्च करतात. त्यामुळे मान्य शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांचे वेतन नियमित अदा करण्यात अडचणी निर्माण होतात. यापुढे अशा बाबी घडू नयेत याची खबरदारी महाविद्यालयाने घ्यावी.

२. वेतन अनुदान व शिक्षण/प्रवेश फी बाबत मिळालेल्या रक्कमा व धनादेश वेतन खात्यात नियमित भरावेत.

३. मान्य शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांच्या वेतनाशिवाय इतर कर्मचा-यांचे वेतन, वेतन खात्यातून अदा करू नये.

४. शासन निर्णय दिनांक २१ सप्टेंबर १९७७ सोबत विहित केलेल्या नमुन्यात कर्मचा-यांना द्यावयाच्या पगाराची माहिती दर महिन्याचे ५ तारखेपर्यंत संबंधित शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण यांचेकडे सादर करावी.

५. कर्मचा-यांच्या वेतनातून कपात केलेले आयकर, व्यवसायकर, भविष्य निर्वाह निधी रक्कम इत्यादीचे हिशोब आवश्यक त्या धनादेशासह संबंधित प्राधिकृत अधिका-यांकडे वेळीच जमा करावी व त्याबाबतची माहिती उच्च शिक्षण संचालक यांना नियमित सादर करावी.

या आदेशाचे पालन न करणा-या संस्थांविरुध्द कडक कार्यवाही करण्यात येईल. सदरची कार्यवाही ही देय वेतनेत्तर अनुदानाच्या किमान ५ टक्के व कमाल २५ टक्के अशी राहील. अनुदानाच्या संदर्भात असलेल्या नियमांचे उल्लंघन झाल्यास त्यानुसार दंडात्मक कार्यवाही करण्याबाबत या आदेशानुसार विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांना प्राधिकृत करण्यात येत आहे. विनाअनुदानित संस्थांकडून अशा अनियमितता निदर्शनास आल्यास त्यांची अनुदान पात्रता तेवढ्या वर्षांनी पुढे ढकलण्यात येईल आणि अनियमितता गंभीर असल्यास त्यांची मान्यता काढून घेण्यात येईल.

शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना विनंती की, हे आदेश विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालये यांच्या निदर्शनास आणावेत व या आदेशाचे त्यांचेकडून काटेकोरपणे पालन होते किंवा नाही याची दक्षता घ्यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

सही/- मि. क. जैन
उपसचिव, महाराष्ट्र शासन

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

पुणे विद्यापीठ

गणेशखिंड, पुणे-४११ ००७
संदर्भ क्र. सीसीओ/१४७३
दिनांक- १८. ६. १९९७

प्रत माहितीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी -
१. मा. प्राचार्य - सर्व संलग्न महाविद्यालये
२. मान्यता प्राप्त संस्था,

आपणास विनंती की, शासनाच्या सदर परिपत्रकाची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी. शासनाच्या परिपत्रकाचा आशय संस्था पालकांच्या नजरेस आणावा.

उपकुलसचिव
(शैक्षणिक )

हेडे/३९३८-३५/९७